मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मतांच्या आकडेवारीत महायुतीच 'आघाडी'वर!

## लोकसभा निवडणुकीतील मिळालेल्या मतांमध्ये सरशी : महाविकास आघाडीला आणखी मेहनत करण्याची गरज

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमधील इच्छुकांनी मैदानात उतरण्याची तयारी केली आहे. राज्यात महायुतीला सपाटून मार खावा लागला असला, तरी शहरात अद्याप महायुतीला तुलनात्मक आकडेवारीमध्ये मताधिक्य आहे. त्यामुळे 'इंडिया आघाडी'ला आणखी मेहनत घ्यावी लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. यापैकी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीन विधानसभा निवडणुकीत महायुतीला एकूण ४ लाख ७ हजार ४३ मते मिळाली आहेत. तसेच, महाविकास आघाडीला ३ लाख ५८८५ मते मिळाली आहे. आकडेवारीची गोळाबेरीज केली असता महायुतीला महाविकास आघाडीपेक्षा एकूण १ लाख १ हजार ६८ मतांधिक्य महायुतीला मिळाले आहे.

चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये भाजपा आमदार अश्विनी जगताप आणि शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे वर्चस्व आहे. या मतदार संघामध्ये महायुतीला ७४ हजार ७६५ मतांची आघाडी आहे. तसेच, पिंपरी विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांचे वर्चस्व आहे. या मतदार संघामध्ये महायुतीला १६ हजार ७३१ मतांचे लीड मिळाले आहे. यासह भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचे वर्चस्व आहे. या ठिकाणी महायुतीला ९ हजार ५७२ मतांची आघाडी आहे.



### महापालिका इच्छुकांना 'रिझल्ट' द्यावा लागणार...

» विधानसभा निवडणूक झाल्यानंतर अवघ्या ४ महिन्यांत महापालिका निवडणुका होणार आहेत. त्यामुळे महापालिकेला इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना 'रिझल्ट' द्यावा लागणार आहे. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत "दिवसा एक पक्ष आणि रात्री एक पक्ष" अशी दुटप्पी भूमिका घेतल्यास इच्छुकांना निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षाच्या महत्वाकांक्षी स्थानिक इच्छुकांनी सावध वाटचाल करण्याची भूमिका ठेवली आहे. अन्यथा ना इकडचा... ना तिकडचा... अशी द्विधा स्थिती होण्याची चिन्हे आहेत.

### ... असा आहे महायुतीचा 'क्लेम'

» २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत १२८ पैकी ११५ पेक्षा जास्त नगरसेवक भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या तिकीटावर निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, सध्यस्थितीला महायुतीकडे स्थानिक पातळीवर प्रभाव ठेवणारे नेते आहेत. त्यांच्या माध्यमातून महायुती आगामी विधानसभा निवडणुकीत वर्चस्व ठेवण्यासाठी ताकदीने मैदानात उतरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेले यश आणि त्यामुळे निर्माण झालेला उत्साह आगामी काळात महायुतीपुढे आव्हान निर्माण करणारा आहे. चिंचवड, पिंपरी आणि भोसरीत मताधिक्य असल्यामुळे जागावाटपाच्या चढाओढीत विद्यमान आमदारांसह त्यांच्या पक्षाचा मतदार संघावरील 'क्लेम' कायम राहणार आहे.

# शहरात कॉलराचे 4 नवीन रुग्ण; एकूण रुग्णांची संख्या पोहोचली 7 वर

## वायसीएम आणि भोसरी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू, महापालिकेकडून दूषित व गढूळ पाणीपुरवठा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून दूषित व गढूळ पाणीपुरवठा झाल्याने भोसरी परिसरातील तीन रुग्णांना पटकीची (कॉलरा) लागण झाली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि.४) चार जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले असून, त्यांच्यावर वायसीएम आणि भोसरी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. रुग्णांची संख्या ७ वर पोहोचली असून सर्वच रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

भोसरी येथील धावडे वस्ती परिसरात महापालिका पाणीपुरवठा विभागाच्या जलवाहिनीतून एका नागरिकाने नळजोड घेतले होते. मात्र, नळजोड घेताना खबरदारी न घेतल्यामुळे वाहिनीला गळती झाली. यातून दूषित पाणीपुरवठा होऊन संबंधित परिसरातील रुग्णांना कॉलराची लागण झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. संशयित रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. आवश्यकता भासल्यास भोसरी रुग्णालयात पाठविण्यात येत आहे. परिसरात महापालिकेच्या वतीने घरोघरी सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

महापालिकेच्या वतीने दोन सदस्य असलेल्या ४४ पथकांमार्फत घरोघरी साथरोगाचे सर्वेक्षण सुरू आहे. आतापर्यंत ९७०५ घरांमधून २६ हजार ५५१ नागरिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. संशयित नागरिकांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांच्या सहवासात आलेल्या नागरिकांना ओआरएस व औषधांचे वाटप केले आहे. तसेच महापालिकेकडून सर्व्हेक्षण सुरू केले आहे.



> संशयित रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी महापालिकेच्या वतीने धावडे वस्तीतील भैरवनाथ शाळेत फील्ड रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे. तेथे संशयित रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. आवश्यकता भासल्यास भोसरी रुग्णालयात पाठविण्यात येत आहे. नागरिकांना याविषयी माहिती व्हावी, यासाठी परिसरात पथनाट्य तसेच रिक्षावर स्पीकर लावून जनजागृती करण्यात येत आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य-वैद्यकीय अधिकारी, महापालिका

# राष्ट्रवादीच्या मागणीने आघाडीत 'बिघाड'?

## लोकसभेच्या मतांप्रमाणे जागावाटप व्हावे : कॉंग्रेस, समान जागा मिळाव्यात : शिवसेना

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने विधानसभेची तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे शहरातील आठपैकी सहा विधानसभा मतदारसंघांवर पक्षाने दावा केला आहे. गेल्यावेळी पक्षाने चार जागांवर निवडणूक लढविली होती.

शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत ही मागणी केली आहे. यावेळी माजी खासदार वंदना चव्हाण, माजी आमदार जयदेव गायकवाड, माजी शहराध्यक्ष रवींद्र माळवदकर यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या सूचनेनुसार आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पुणे शहरातील आठही विधानसभा मतदारसंघातील प्रमुख नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली.

या बैठकीत महाविकास आघाडी म्हणून विधानसभा निवडणूक लढवत असताना पुणे शहरातील कोणकोणत्या मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हवेत याविषयी चर्चा झाली.

बैठकीनंतर जगताप म्हणाले, मागील विधानसभा निवडणुकीत हडपसर, पर्वती, वडगाव शेरी, खडकवासला मतदारसंघांत पक्षाने उमेदवार दिला होता. आता पक्षाचा स्ट्राइक रेट चांगला आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाने व्यापक विचार करुन जास्त जागांची मागणी केली नाही. मात्र, आता विधानसभा निवडणुकीसाठी सहा जागांची आमची मागणी आहे. नव्याने शिवाजीनगर व कॅन्टोन्मेंट विधानसभा जागेसाठी आम्ही आग्रही आहोत.

पुणे शहरातील आठपैकी पैकी सहा विधानसभा मतदारसंघाची मागणी एकट्या राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने केली आहे. त्यामुळे कॉंग्रेस आणि शिवसेनेने याबाबत थेट नाराजी व्यक्त केली आहे. यावर "राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाला महाविकास आघाडी तोडायची आहे का?' असा सवाल कॉंग्रेस पक्षाने केला आहे.

तर शिवसेनेने (ठाकरे) "शहरात जागा वाटपात समान वाटा मिळावा,' अशी मागणी केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांची ही मागणी असली, तरी जागा वाटपासून स्थानिक पातळीवर मात्र नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

मागील विधानसभेला कॉंग्रेसला अवघ्या काही हजार मतांसाठी पराभव पत्कारावा लागलेल्या कॅन्टोन्मेंट आणि शिवाजीनगर मतदारसंघाची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून करण्यात आली आहे. आधीच कसबा मतदारसंघात कॉंग्रेसचा आमदार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीला या तीन जागा कॉंग्रेस सोडणार नाही.

राष्ट्रवादी कॉंग्रेसने पर्वती, हडपसर, खडकवासला, वडगावशेरी या जागा लढल्या होत्या. त्यात जे दोन आमदार निवडून आले, ते अजित पवारांकडे आहेत. त्यामुळे शिवसेनाला केवळ कोथरूडचीच जागा आहे. त्यामुळे शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली असून शहरातील सहा जागांमध्ये प्रत्येकी दोन जागां मिळाव्यात असा शिवसेनेचा आग्रह आहे.




### त्यांना आघाडी तोडायची आहे का?

» राष्ट्रवादीची ही मागणी म्हणजे सरळ सरळ आघाडी तोडण्याची तयारी असल्याची टीका कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केली आहे. प्रशांत जगताप हे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष आहेत. लोकसभेत आघाडीने एकत्रपणे काम केले. त्यानंतर आता राष्ट्रवादीची भूमिका रास्त नाही. लोकसभेच्या मतदानाच्या आकडेवारीनुसार जागा वाटप व्हावे, अशी आमची भूमिका आहे. ती आम्ही आमच्या नेत्यांकडे मांडू. त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे,' असे शिंदे यांनी म्हटले आहे.

### सर्वस्वी निर्णय शरद पवारांचा

» महाविकास आघाडीतील अन्य पक्षही विधानसभा जागेवर दावा करीत असतील. मात्र सद्यस्थितीत पक्षाने सहा जागांची मागणी केली आहे. ही कार्यकर्ता व पक्षाची मागणी आहे. याबाबत सर्वस्वी निर्णय पक्षाचे अध्यक्ष शरद पवार घेणार आहेत, अशी माहिती वंदना चव्हाण यांनी दिली.

"पुण्यात आठ जागा आहेत. त्यात शिवसेनेला समान जागा मिळाव्यात, अशी आमची आग्रही मागणी आहे. राष्ट्रवादीकडून सहा जागा मागण्याला काहीच अर्थ नाही. कसबा, कोथरूड, पर्वती, वडगावशेरीत आमच्यामुळे आघाडीच्या उमेदवाराला मताधिक्य आहे. मागील विधानसभेला राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस सोबत लढले होते. त्यात २ जागा राष्ट्रवादीला मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडली म्हणजे त्या जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या होतात असे नाही. आम्हीसुद्धा आघाडीत आहोत याचा विचार करून त्यांनी आघाडी धर्म पाळत जागांची मागणी करावी."

\- गजानन थरकुडे, शहरप्रमुख, शिवसेना (ठाकरे)

# पुरंदर विमानतळ नेमके कोणत्या टप्प्यावर?


## केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिलं उत्तर

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदरमधील प्रस्तावित विमानतळ मूळ जागीच होणार आहे. याला नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने मान्यता दिली आहे. लवकरच याबाबत सर्व यंत्रणांची बैठक होणार आहे. त्यानंतर एकत्रितपणे जागेची पाहणी केली जाईल. यानंतर विमानतळाच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

पुणे विमानतळावर मोहोळ यांनी रविवारी आढावा बैठक घेतली. यानंतर बोलताना ते म्हणाले की, पुरंदर विमानतळ मूळ जागीच करण्याचा निर्णय झाला आहे. याला नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने मंजुरी दिली आहे. यावर आता महासंचालनालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांची बैठक होईल. या बैठकीनंतर एकत्रित जागेची पाहणी केली जाईल. यानंतर प्रत्यक्षात भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होईल.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने २०१८ मध्ये केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाकडे पुरंदर विमानतळाचा प्रस्ताव पाठवला होता. महायुती सरकारच्या काळात पुरंदर विमानतळासाठी '१ ए' जागा ठरविण्यात आली. विमानतळाचा प्रस्ताव मंजूर झाला होता मात्र २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारने जागा बदलून '५ ए' केली. तांत्रिक अडचणीमुळे हा प्रस्ताव रखडला. त्यानंतर महायुतीच्या सरकारने २०२३ मध्ये पुन्हा मूळ जागेचा प्रस्ताव पाठविला. त्यानंतर मूळ जागीच विमानतळ उभारण्यास नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने मंजुरी दिली आहे.



### नवीन टर्मिनल लवकरच सुरू

» पुणे विमानतळाचे नवीन टर्मिनल लवकरच सुरू केले जाणार आहे. नवीन टर्मिनलसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) अतिरिक्त मनुष्यबळ देण्याची मागणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे. त्यांनी यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे अतिरिक्त मनुष्यबळ मिळून नवीन टर्मिनल लवकरच सुरू होईल, असा विश्वासही मोहोळ यांनी व्यक्त केला.

# मेट्रोची भूगर्भ परीक्षणासह अन्य कामे थांबणार

## पालखी सोहळ्याच्या मार्गात होतोय अडथळा, आयुक्तांचे मेट्रोचे महासंचालक श्रावण हर्डीकर यांना पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी ते भक्ती शक्ती (निगडी) चौकापर्यंत मेट्रोच्या कामासाठी प्रत्यक्ष खोदकामाला सुरुवात झाली आहे. या विस्तारित मेट्रोच्या मार्गाचे भुगर्भ स्तरांचे परीक्षण (सॉईल टेस्टींग) करण्यात येत आहे. याकरिता मेट्रोकडून चिंचवड ते निगडी दरम्यान ८१ ठिकाणी लॉग बोअर घेतले जात आहेत. मात्र संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखीचे २८ जूनला देहूतुन प्रस्थान होणार आहे. त्यामुळे निगडी ते दापोडी मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होईल. याकरिता मेट्रोकडून भुगर्भ परीक्षणासह संपुर्ण काम बंद ठेवावे, त्या कामाचे सगळे साहित्य गोळा करावे. जेणेकरून रस्त्यावरील अडथळा दुर करून संपूर्ण रस्ता खुला करावा, असे पत्र महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मेट्रोचे महासंचालक श्रावण हर्डीकर यांना दिले आहे.

निगडीतील भक्ती-शक्ती चौकात मेट्रोच्या खोदकामाला सुरुवात झाली. भक्ती-शक्ती चौक आणि पवळे ब्रीज येथे बॅरिकेटिंग केले आहे. महामेट्रोकडून भक्ती- शक्तीसह मेट्रोच्या प्रत्येक पिलरला भुगर्भ परीक्षण करण्यास चिंचवड ते निगडी या मार्गावरील रस्त्यावर लॉग बोअर घेतले जात आहेत. त्यानंतर कामाचा ले-आऊट तयार करण्यात येणार आहे. मेट्रोच्या खोदकामामुळे पोलिसाच्या वाहतूक शाखेने चिंचवडच्या मदर तेरेसा उड्डाणपूल ते भक्ती शक्ती चौक निगडीपर्यंत वाहतुकीत बदल केला आहे. या बदलामुळे वाहतुकीचा भार इतर रस्त्यांवर आल्याने वाहतूक कोंडीचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.

जून्या पुणे-मुंबई महामार्गावर सतत प्रचंड वाहनाची वर्दळ असते. या मार्गावर शहरातील नियमित वाहतूक, मुंबईकडे जाणा-या एसटी आणि इतर खासगी वाहनांची वर्दळ असते. त्यातच मेट्रोकडून माती परीक्षणासाठी चिंचवड ते निगडी दरम्यान ८१ ठिकाणी लॉग बोअर घेतले जात आहेत. वाहतुकीला रस्ता अरुंद होऊन वाहतुकीचा खोळंबा होऊ लागला आहे.

दरम्यान, संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळा अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपला आहे. देहूतुन २८ जून रोजी संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. या प्रस्थान सोहळ्यात वारकऱ्यांना विविध सोयी-सुविधा महापालिका प्रशासनाकडून देण्यात येतात. तसेच सालाबाद प्रमाणे संत तुकाराम महाराज यांची पालखी २९ आणि ३० जूनला निगडी ते दापोडी मार्गावरून जाणार आहे. परंतू निगडी ते चिंचवड पयत मेट्रोकडून खोदाई सुरु आहे. तर पिंपरी ते दापोडी मार्गावर काही किरकोळ कामे अद्याप अपूर्ण आहेत. त्या कामाचा पालखी मार्गावर अडथळा ठरणार आहे.

त्यात वल्लभनगर या ठिकाणी विकसनाचे काम सुरू आहे. स्तंभ क्रमांक ३०९ क्रॉस ड्रेनेज वक मधून विद्युत केबल टाकल्यामुळे स्थानकांच्या आवारातील आणि परिसरातील येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नाही. ते पाणी यशवंतराव चव्हाण पुतळ्यासमोरील रस्त्यावर साचून संपुर्ण सेवा रस्ता पाण्याने व्यापलेला असतो. यामुळेच पालखी मार्गात अडथळा येणार आहे.



### चिंचवड स्टेशन येथून चिंचवड गाव अवजड वाहतुक प्रवेश बंद

» चिंचवड स्टेशन येथून चिंचवड गावात जाताना सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना प्रवेश बंद आहे. त्यामुळे सर्व वाहने खंडोबा माळ चौकातून पुढे मार्गस्थ होतात. तर, आता खंडोबा माळ चौकाकडून पिंपरीकडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या जड अवजड वाहतुकीला प्रवेश बंद आहे. त्यामुळे कोंडीत अधिक भर पडत आहे.

### सध्यस्थितीत अशी सुरु आहे वाहतूक

» चिंचवड ते निगडी मेट्रोकडून खोदाई सुरुवात केलेली आहे. त्यामुळे पोलिसांकडून वाहतूक बदल केले होते. निगडीत एसटीचा थांबा आहे. परिणामी सर्व एसटी बस या टिळक चौकातून जातात. तर, भक्ती शक्ती चौकाकडून येणारी जड, अवजड वाहने टिळक चौकाकडे न जाता भक्ती शक्ती सर्कल वरून अंकुश चौक-त्रिवेणीनगर चौक-दुर्गानगर-थरमॅक्स चौकातून जाणार असल्याचे वाहतूक विभागाने म्हटले आहे. तर, भक्ती शक्ती चौकाकडून येणाऱ्या लक्झरी बसेस टिळक चौकाकडून खंडोबा माळ चौकाकडे न जाता भेळ चौक-संभाजी चौक मार्गे जाणार आहेत. त्यामुळे या मार्गावर कोंडी होत आहे. तर, दुर्गानगर चौकाकडून येणारी जड अवजड वाहन डावीकडून खंडोबा माळ चौकाकडे न वळता सरळ भेळ चौक-संभाजीनगर चौकातून जाणार आहेत. तसेच टिळक चौकापासून काळभोरनगर अंडरपासपासून पुढे बीआरटीमधून जाण्यास वाहन जात आहेत.

# शहरातील 97 टक्के नाल्यांची साफसफाई पूर्ण!

## आठ क्षेत्रीय कार्यालियाअंतर्गत करण्यात आली 143 नाल्यांची सफाई, पालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यकारी अधिकाऱ्यांचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सूनचा पाऊस सुरू झाला आहे. पावसाळ्यात पाणी साचून पूरस्थिती निर्माण होऊ नये, पाण्याचा निचरा तात्काळ व्हावा, याकरिता महापालिका आयुक्तांनी ३१ मेपर्यंत नालेसफाईचे आदेश दिले होते. त्यानंतर १ जून रोजी आयुक्तांनी नाले सफाईचा आढावा घेऊन स्थळ पाहणीही केली, त्यानंतर १३ जूनअखेर शहरात १४३ नाल्यांची ९७ टक्के साफसफाई पुर्ण झाली आहे, असा दावा आरोग्य कार्यकारी अधिकारी यशवंत डांगे यांनी केला.

पिंपरी-चिंचवड शहरात छोटे-मोठे १४३ नाल्यांची पावसाळी पूर्व साफसफाई करण्यास आरोग्य विभागाने सुरुवात केली. शहरातील पावसाळी पुर्व नाल्यांची साफसफाई ३१ मे अखेर पुर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी आरोग्य विभागास दिले होते. त्यानुसार आरोग्य विभागाने आठ क्षेत्रीय कार्यालयामधून नाले साफसफाई करण्यात येत आहे. शहरामध्ये २ ते ११ मीटर रुंदीचे १०० किलो मीटर अंतराचे १४३ नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात. सर्वच नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार व टाकाऊ साहित्य टाकले जाते. अनेक नागरिक घरगुती कचरा या नाल्यांमध्ये टाकतात. या नाल्यात गाळ साचल्याने नाले अरुंद व उथळ होतात.

शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्या वाहतात. त्यांना मिळणारे १४३ नाले शहरात आहेत. बहुतांश नाले काही भागात बुजवले असून, त्यावर बांधकामे झाली आहेत. काहींची काँक्रीटने बांधणी करून, 'नाला पार्क' केले आहेत. मात्र, नाल्यांमध्ये उगवलेले गवत, झाडे, झुडपे, नागरिकांकडून टाकला जाणारा राडारोडा, कचरा यामुळे पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह रोखला जाऊन पूरस्थिती निर्माण होते. नाल्यांमुळे पुरपरिस्थिती टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वी दरवर्षी नालेसफाई केली जाते. यावर्षी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई गती देऊन नियोजनबद्ध पद्धतीने काम वेळेत पूर्ण करण्याचा आदेश आयुक्त सिंह यांनी गेल्या महिन्यात सर्व अधिकाऱ्यांना दिला होता. मात्र, आरोग्य विभागाकडून आठ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १४३ नाल्यांची तब्बल ९७ टक्के साफसफाई केल्याचे सांगण्यात येत आहे.



"शहरातील नालेसफाई ९७ टक्के झाली आहे. सर्वच नाले स्वच्छ करण्यात येत आहेत. काही ठिकाणी अद्याप यंत्राच्या सहाय्याने नालेसफाई सुरू आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय कार्यालय निहाय पथके नियुक्त केलेली आहेत. त्यांच्या माध्यमातून उर्वरित कामे देखील लवकरच पुर्ण केली जातील.

\- यशवंत डांगे, आरोग्य कार्यकारी अधिकारी, महापालिका, पिंपरी-चिंचवड

### महामार्गावर नाला, सी.डी.वर्क सफाई सुरु

» पुणे-मुंबई महामार्गावरील नाला, सी.डी.वकर्स कामाची सफाई तसेच क्रॉस पाईप केलेल्या ठिकाणी अद्याप कामे सुरु आहेत. यामध्ये सँडविक कंपनी, फुगेवाडी, नाशिक फाटा, हॉटेल कलासागर, खराळवाडी, मोरवाडी, बॉम्बे सिलेक्शन, चिंचवड स्टेशन, हायवे टॉवर, बजाज कंपनी समोर, निगडी टिळक चौक, श्रीकृष्ण मंदिर निगडी या ठिकाणी अद्याप कामे सुरु आहेत.

# घोड नदीपात्रात अवैध वाळूउपसा सुरूच

## वाळू लिलावात शासकीय नियमांची पायमल्ली, निवेदन देऊनही महसूल विभागाचे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

पारगाव (ता. आंबेगाव) येथील घोड नदीपात्रात शासकीय वाळू लिलावात शासकीय नियमांची पायमल्ली करून अवैध वाळू उपसा सुरू आहे. तो तातडीने बंद करावा, अशी मागणी पारगाव ग्रामपंचायतीने करूनही महसूल विभाग मात्र आर्थिक व्यवहारामुळे डोळ्यावर पट्टी बाधून बसल्याने चर्चेचा विषय ठरला आहे. शासनाने येथील वाळू लिलाव तातडीने बंद करून चौकशी करावी, अशी मागणी पारगाव ग्रामपंचायतीने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून केल्याची माहिती सरपंच श्वेता ढोबळे आणि उपसरपंच नितीन ढोबळे यांनी दिली.

पारगाव येथील घोडनदी पात्रात सहा महिन्यापासून शासकीय वाळू उपसाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. संबंधित ठेकेदारांकडून शासनाच्या नियमानुसार वाळूचे वाटप होत नसल्याचे ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आले आहे. तसेच वाळू डेपो आणि वाळूची उचल नियमानुसार होत नाही, वाळूची विक्री वजनानुसार होत नाही, वजन काटे अस्तित्वात नाहीत, वाळू डेपोवर सीसीटीव्ही बसवलेला नाही, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना नियमानुसार नंबर प्लेट बसवलेली नाही. तसेच जीपीएस यंत्रणा बसवलेले नाही,



> संबंधित ग्रामपंचायतीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. मंडलधिकारी आणि तलाठी यांना पारगाव येथे पाठवून होत असलेल्या वाळू उपसा नियमानुसार होतं का नाही याची पाहणी करून अहवाल देण्याचा आदेश देण्यात आला आहे.
> - संजय नागटिळक, तहसीलदार,आंबेगाव, घोडेगाव.

वाळूची वाहतूक सकाळी सहा ते सायंकाळी सहापर्यंत होणे गरजेचे असताना रात्रंदिवस वाहतूक केली जाते. शासकीय घरकुल लाभार्थ्यांना वारंवार मागणी करूनही वाळू पुरवठा केला जात नाही. घोडनदी पात्रालगत असणाऱ्या भीमाशंकर साखर कारखाना तसेच इतर चार सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या विहिरी असून रात्रंदिवस वाळू उपसा तसेच वाहन व पोकलेन मशीन यांच्यामुळे नदी पात्रालगत असणाऱ्या पिण्याच्या विहिरीतील पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने लिलाव बंद करावा, अशी मागणी ग्रामपंचायतीने केली आहे. शासकीय दराने नागरिकांना वाळू मिळावी हा शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे आतापर्यंत आंबेगाव तालुक्यात किती कुटुंबाना या योजनेचा लाभ मिळाला याची शासनाने यादी जाहीर करावी. म्हणजे खरच किती जणांना वाळू मिळाली की फक्त त्यांच्या नावावर वाळू वाटप झाली आहे. परंतु त्यांना प्रत्यक्षात वाळू मिळालीच नाही. किंवा त्यांचे कोणतेही बांधकाम सुरू नाही ही बाब निदर्शनास येईल, असे नागरिकांनी म्हणणे आहे.

घोडनदीच्या पात्रात गेली कित्येक दिवस राजरोसपणे बोटींच्या सहाय्याने अवैध वाळूउपसा चालू आहे. शिंदोडी गावच्या हद्दीत वाळूउपसा करत तो श्रीगोंदा तालुक्याच्या हद्दीत नेऊन ठेवला जातो. कारवाईची खबर मिळताच दुसऱ्या हद्दीत पसार होणे व वातावरण निवळले की पुन्हा अवैध वाळूउपसा करत नदीपात्राचे लचके तोडायचे, असा उद्योग राजरोसपणे चालू आहे. यामुळे पर्यावरणाची व नदीपात्राची मोठी हानी होत असून लगतच असणाऱ्या घोड धरणाला याची थेट धोका पोहचू शकतो. शिवाय यांत्रिक बोटींमधून गळणारे डिझेल, ऑईल यामुळे पाणी दूषित होत आहे. दूषित पाण्यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

### तहसीलदारांना निवेदन...

» पारगाव येथील घोडनदी पात्रात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा झाल्याने खड्डे निर्माण झाले आहे. त्यामुळे नदी पात्रात असणाऱ्या खड्ड्यामुळे शेती पंप काढण्याच्या प्रयत्नात काही शेतकऱ्यांना धोका होऊ शकतो. या संदर्भात तहसीलदार संजय नागटिळक यांना निवेदन दिल्याचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी सांगितले.

> या भागातील अवैध वाळूउपशाची विषवल्ली प्रशासनाने समूळ नष्ट करावी. पर्यावरणाची हानी टाळून जलचर व मानवी जिवीतीचे रक्षण करावे. वाळूमाफिया व त्यांना साथ देणाऱ्यांवर कडक कारवाई करावी.
> - अरुण खेडकर, सरपंच शिंदोडी

# प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत आता तज्ज्ञ डॉक्टर्स हवे

## राजगुरूनगर येथील नागरिकांची अपेक्षा, प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व सोयी-सुविधा युक्त पूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

राजगुरूनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व सोयी-सुविधा युक्त इमारत पूर्ण झाली. येथील आरोग्य केंद्रात रोज 200 ओपीडी होत होत्या. आता त्याची संख्या वाढणार आहे. सर्वसामान्य नागरिकांची धाव प्राथमिक आरोग्य केंद्राकडे असते. त्यामुळे वेळेत उपलब्ध होणारे आणि तज्ज्ञ डॉक्टरांची गरज आहे. या आरोग्य केंद्रात गर्भवती महिलाची आणि प्रसूती संख्या मोठी असणार आहे. त्यामुळे येथील आरोग्य केंद्रात महिला तज्ज्ञ डॉक्टरची गरज आहे. इमारत सुसज्ज झाली सर्व सुविधा उपलब्ध झाल्या मात्र तज्ज्ञ डॉक्टरांची येथे जिल्हा परिषदेने नियुक्ती करावी अशी नागरिकांची मागणी आहे.

सुमारे दीड लाख लोकसंख्या असलेल्या राजगुरूनगर शहर व परिसरातील गावे वाड्या वस्त्या याना राजगुरूनगर प्राथमिक आरोग्य केंद्रातून आरोग्य सेवा दिली जात होती. शहरीकरण झपाट्याने वाढले. त्यापेक्षा जास्त लोकसंख्या वाढली.



येथील आरोग्य केंद्राची इमारत अपुरी पडत होती त्यातच ती मोडकळीस आली होती. या इमारतीवर झाडेझुडपे उगवल्याने त्याच्या भिंती आणि स्लॅब ला भेगा पडल्याने येथील आरोग्य केंद्र एका शासकीय जागेत सुमारे 600 स्केवर फुटाच्या जागेत गेली तीन वर्षे सुरु होते. अपुऱ्या जागेत आरोग्य केंद्रातील डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांना आपला जीव मुठीत ठेवून कामे करावे लागत असे, त्याचा परिणाम आरोग्य सेवेवर होत होता.

### या आहेत सोयी

» राजगुरूनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत सुसज्ज अत्याधुनिक उपकरणांसह सुसज्ज तीन मजली इमारत बांधण्यात आली आहे. यात लिफ्टची सोय करण्यात आली आहे. इमारतीत रुग्णांना, डॉक्टरांना बसण्यास केबीन, औषध वितरण सेवा, ऑपरेशन थिअटर, गर्भवती महिलांची तपासणी व प्रसुती सुविधा, प्रसुतिगृह, प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृह, स्नानगृह, प्रयोगशाळा, महिला व पुरुष रुग्णांसाठी दोन खोल्यामध्ये सेपरेट बेड, ज्येष्ठ व रुग्णांना बसण्याची व्यवस्था अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

राजगुरूनगर प्राथमिक आरोग्य केंद्रातील तत्कालीन डॉ. सुरेश गोरे आणि भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कौदरे यांनी पुढाकार घेऊन चाकण एमआयडीसीमधील कंपन्यांकडून सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) मिळण्यासाठी प्रयत्न केले. सुरेश कौदरे यांनी चाकण एमआयडीसी येथील बॉश चॉईस सिस्टीम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीशी सामाजिक बांधिलकी म्हणून आरोग्य केंद्राची इमारत बांधून द्यावी असा पत्रव्यवहार केला. त्यात या कंपनीच्या अधिका-यांनी येथील आरोग्य केंद्राची पाहणी केली. नागरिकांची गरज लक्षात घेत कंपनीने सुमारे साडेपाच कोटी रुपये निधीला मान्यता दिली. त्यानुसार बांधकाम सूरू करून ते आता पूर्णत्वास आले आहे.